“स्वरसाम्राज्ञी आशा भोसले संगीत जीवनगौरव पुरस्कार” नियमावली, निवड प्रक्रिया, समिती रचना, आर्थिक तरतूद व अंमलबजावणीबाबत

महाराष्ट्र शासन

सांस्कृतिक कार्य विभाग

शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२६/प्र.क्र.२४५(ई.१७०४८३९)/सां.का.४

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १४ जुलै, २०२६.

<u>वाचा</u> :- सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.सां.का.सं./१८६१, दिनांक ०९ जून, २०२६.

<u>प्रस्तावना</u> :-

महाराष्ट्र राज्याला संगीत, नाट्य, साहित्य, चित्रपट, लोककला तसेच विविध सांस्कृतिक क्षेत्रांची समृद्ध परंपरा लाभलेली आहे. भारतीय संगीत क्षेत्राच्या विकासामध्ये महाराष्ट्रातील अनेक नामवंत कलाकारांनी मोलाचे योगदान दिले आहे. अशा कलाकारांच्या कार्यामुळे राज्याची सांस्कृतिक ओळख राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर दृढ झाली आहे. स्वरसम्राज्ञी आशा भोसले या भारतीय गायन/संगीत क्षेत्रातील एक अजरामर व्यक्तिमत्त्व असून त्यांनी आठ दशकांहून अधिक काळ विविध भारतीय भाषांमधून गायन करून संगीत क्षेत्रात अतुलनीय योगदान दिले आहे. त्यांच्या गायकीने भारतीय संगीताला जागतिक स्तरावर मान्यता मिळवून दिली आहे. त्यांचे संगीत क्षेत्रातील योगदान, कार्यनिष्ठा, सातत्य आणि उत्कृष्टता या गुणांमुळे त्या अनेक कलाकारांसाठी प्रेरणास्थान आहेत. महाराष्ट्रातील गायन/संगीत क्षेत्रात आयुष्यभर समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या ज्येष्ठ व ख्यातनाम कलाकारांचा सन्मान करण्यासाठी स्व. आशा भोसले यांच्या स्मरणार्थ सांस्कृतिक कार्य विभागामार्फत "स्वरसम्राज्ञी आशा भोसले संगीत जीवनगौरव पुरस्कार" सुरू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्रातील गायन/संगीत क्षेत्रामध्ये उत्तम व प्रदीर्घ कार्य केलेल्या एका ज्येष्ठ कलावंतास दरवर्षी “स्वरसम्राज्ञी आशा भोसले संगीत जीवनगौरव पुरस्कार” प्रदान करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. सदर पुरस्कार प्राप्त पुरस्कारार्थींना सन्मानचिन्ह, शाल व पुरस्कार रक्कम रोख रुपये १०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लक्ष फक्त) देण्यात येऊन सन्मानित करण्यात येईल.

i) **<u>पुरस्कारासाठी पात्रता/निकष</u> :-**

१) गायन/संगीत क्षेत्रात चिकाटीने, एकनिष्ठेने सातत्याने प्रदीर्घकाळ काम करणारे जेष्ठ, ख्यातनाम आणि राज्याला गौरव प्राप्त करुन देणारा कलाकार पुरस्कारासाठी पात्र असेल.

२) कलाकार सध्या प्रकाशात नसला तरी गायन/संगीत क्षेत्रात कार्यरत असणारा असावा.

३) कलाकाराची त्याच्या कलाक्षेत्रातील कर्तृत्वाची जेष्ठता सिध्द असावी.

४) कलाकार महाराष्ट्र राज्यातील किमान १५ वर्षे रहिवासी असला पाहिजे. केवळ जन्मत: महाराष्ट्रीय कलाकारांचाच विचार मर्यादित न ठेवता ज्या इतर प्रांतीय कलाकारांनी कलेची सेवा केली आहे. अशा कलाकारांचाही विचार केला जाईल.

५) हा पुरस्कार मिळण्यास जात, धर्म, लिंग ह्या गोष्टींचा विचार केला जाणार नाही.

६) शासनाकडून यापूर्वी कोणताही जीवनगौरव पुरस्कार प्राप्त झाला असल्यास, अशा व्यक्ती ह्या पुरस्कारासाठी पात्र असणार नाहीत.

ii) **पुरस्कार वितरण :-**

स्वरसम्राज्ञी आशा भोसले यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून दरवर्षी ८ सप्टेंबर रोजी किंवा त्या तारखेच्या जवळपास आयोजित करून सदर पुरस्कार वितरण करण्यात येईल.

०२. सदर पुरस्कार निवडीसाठी खालील प्रमाणे निवड समिती गठित करण्यात येईल -

अ.क्र.	तपशिल	पदनाम
१.	मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य	अध्यक्ष
२.	अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/ सचिव,सांस्कृतिक कार्य विभाग	सदस्य
३.	संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय	सदस्य सचिव
४.	गायन/संगीत क्षेत्रातील ५ ते ७ कलावंत/तज्ञ	अशासकीय सदस्य

०३. सदर पुरस्कार रक्कम खर्च “मागणी क्र. झेडडी-२, २२०५ कला व संस्कृती,००, १०२- कला व संस्कृती प्रचालन, (०२) राज्य नृत्य, नाट्य, तमाशा संगीत महोत्सव (०२)(०२) राज्य कला संस्कृति जतन, संवर्धन विविध महोत्सव तसेच इतर कार्यक्रम लेखाशीर्ष (२२०५ १५०७), ०५- बक्षिसे व व पुरस्कार वितरण आयोजन खर्च “लेखाशीर्ष (२२०५ १५०७), ५० इतर खर्च” अंतर्गत त्या-त्या आर्थिक वर्षासाठी मंजूर असलेल्या आर्थिक तरतुदीतून भागविण्यात यावा.

०४. यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना नियंत्रण अधिकारी तसेच लेखाधिकारी, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०५. सदर खर्च वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/विनिमय, भाग २, दिनांक १७ एप्रिल, २०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-३, अ.क्र. ४ परिच्छेद क्र. २७ (२) (अ) अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार मंजूर करण्यात येत आहे.

०६. सदर प्रकरणी वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९ एप्रिल, २०२६ मधील सर्व परिच्छेद परीशिष्टातील अटींनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांची राहील.

०७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०७१४१७१२३५१६४३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BALASAHEB
ISHWAR SAWANT

Digitally signed by BALASAHEB ISHWAR SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT, 2.5.4.20=79fcecc76dd8693a7bfcec682ee63eee2edaf06ba586ac71715d8e6ba4d62fbe, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=327FE83917B9691D96F2C6AEB03B51A86A595CCAC9264923EA4CD090FFD03E83, cn=BALASAHEB ISHWAR SAWANT
Date: 2026.07.14 17:13:55 +05'30'

(बाळासाहेब ईश्वर सावंत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
३. उप सचिव (सां.का.४) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, जुने सचिवालय इमारत, पहिला मजला, एम. जी. रोड, मुंबई.
५. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. महालेखापाल (लेखापरीक्षा) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
९. महालेखापाल (लेखापरीक्षा) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१२. निवडनस्ती, सां.का. ४